(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**राजस्थान राज्य**
**विरुद्ध**
**ताराचंद आणि इतर**
**११ फेब्रुवारी ,१९९७**
**[ न्यायमूर्ती- के. रामास्वामी , एस. सगीर अहमद आणि जी. बी. पटनायक ]**

**सेवाविषयक विधी :**

राजस्थान प्रशासकीय सेवा नियम, १९५४:

नियम २८-बी - विचाराधीन कालावधीसाठी अधिकाऱ्याचे सेवा अभिलेख - पदोन्नतीनंतर नियमात केलेली दुरुस्ती -अधिनिर्णित, नियमानुसार, अधिकाऱ्याचे सेवा अभिलेख उत्कृष्ट किंवा सातत्यपूर्णपणे खूप चांगले असावे आणि याचा अर्थ असा होतो की विचाराधीन असलेल्या संपूर्ण कालावधीसाठी असाच असावा- दिनांक ३०.११.१९९१ रोजी नियमात केलेल्या सुधारणा, पदोन्नतीच्या आदेशांनुसार असल्याने, त्या सुधारणा लागू होण्यापूर्वीच्या प्रकरणांना लागू होऊ शकत नाहीत.

शंभू सिंग मीना विरुद्ध राजस्थान राज्य, [१९९५] पुरवणी २ एस. सी. सी. ४३१; यावर भर दिला

**दिवाणी अपील न्यायाधिकार क्षेत्र: विशेष अनुमती याचिका (सी ) क्रमांक ३५५१/१९९७.**

राजस्थान उच्च न्यायालयाच्या डी. बी .सी. डब्ल्यू . पी. ( D.B.C.W.P.) क्रमांक ६०३८/१९९२ मधील दिनांक ९. ७. ९३ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

याचिकाकर्त्याची बाजू अरुणेश्वर गुप्ता आणि मनोज के. दास यांनी मांडली.

न्यायालयाने खालील आदेश दिला :

विलंब माफ केला.

या प्रकरणात उपस्थित झालेला वाद शंभू सिंग मीना विरुद्ध राजस्थान राज्य, [१९९५] पुरवणी २ एस. सी. सी. ४३१; मधील या न्यायालयाच्या एका निकालाद्वारे आधीच समाविष्ट करण्यात आला आहे, ज्यामध्ये राजस्थान प्रशासकीय सेवा नियम १९५४ च्या नियम २८-बी आणि दिनांक ३० नोव्हेंबर १९९१ पूर्वीच्या त्याच्या स्पष्टीकरणावर विचार करून या न्यायालयाने अर्थ लावला होता आणि असे अधिनिर्णित केले की नियमानुसार, अधिकाऱ्याचे सेवा अभिलेख उत्कृष्ट किंवा सातत्यपूर्णपणे खूप चांगले असावे आणि याचा अर्थ असा होतो की विचाराधीन असलेल्या संपूर्ण कालावधीसाठी असाच असावा. त्यामुळे त्यामुळे उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन कायम ठेवण्यात आला आणि असे अधिनिर्णित केले की ,दिनांक ३०.११.१९९१ रोजी नियमात केलेल्या सुधारणा, त्या प्रकरणांमध्ये आव्हान दिलेल्या पदोन्नतीच्या आदेशांचे पालन करत असल्याने त्या सुधारणा लागू होण्यापूर्वीच्या प्रकरणांना लागू होऊ

शकत नाहीत. हेच प्रमाण या प्रकरणातील तथ्यांना लागू होते. त्यामुळे, हस्तक्षेपासाठीची नोटीस बजावण्याचे कोणतेही कारण आम्हाला आढळत नाही.

सबब, याचिका फेटाळण्यात आली आहे.

आर. पी. (R. P. )

याचिका फेटाळण्यात आली.

****

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

****